**जमिनीच्या वैधानिक दर्जाबाबत**
**अभिप्राय / ना-हरकत प्रमाणपत्र देताना**
**अवलंबावयाची कार्यप्रणाली - सुधारणा.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक - एस-१०/२०२५/प्र.क्र.१७२/वने-०३ (फ-३)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० एप्रिल, २०२६.

वाचा:-

१. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. एस-१०/२०११/प्र.क्र.२८५/फ-३, दिनांक २३.०८.२०११.
२. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. एस-१०/२०११/प्र.क्र.२१६/फ-३, दिनांक ८.०८.२०१३.
३. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. एस-१०/२०२५/प्र.क्र.१७२/फ-३, दिनांक ९.०३.२०२६.

**शासन परिपत्रक :**

शासनाच्या तसेच खाजगी मालकीच्या जमीन खरेदी-विक्री, जमीन विकसित करण्याचे प्रस्ताव (प्रादेशिक योजनांमध्ये एकात्मिकृत नगरवसाहत प्रकल्पासाठी व इतर) तसेच प्रकल्पांसाठी भूसंपादन इ. करिता महसूल विभाग, नगर विकास विभाग तसेच अन्य विकास प्राधिकारणाच्या तसेच इतर प्रस्तावांच्या अनुषंगाने संबंधित विभागांकडून / यंत्रणांकडून प्रस्तावित क्षेत्रांच्या / जमिनींच्या वैधानिक दर्जाबाबत अभिप्रायांची तसेच ना-हरकत प्रमाणपत्रांबाबत उक्त संदर्भ क्र. ३ शासन परिपत्रक दि. ९.०३.२०२६ अन्वये अवलंबावयाच्या कार्यप्रणालीबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

२. तथापि, उक्त शासन निर्णयाच्या परिणामी क्षेत्रीयस्तरावर निर्माण संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने स्पष्ट करण्यात येत की, यापुर्वी संदर्भिय शासन परिपत्रकांन्वये देण्यात आलेले निर्देश खालीलप्रमाणे पुन:श्च फेरउद्धृत उद्धत करण्यात येत आहे -

**२.१ शासन परिपत्रक दिनांक २३.०८.२०११**

“जमिनीच्या वैधानिक दर्जाबाबत विविध विभागांकडून वन विभागाकडे विचारणा होत असते. त्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या नस्तीवर वन विभागाचे अभिप्राय नोंदवावयाचे असतात. त्याकरिता संबंधित क्षेत्रीय वन विभाग व वनवृत्तांकडून तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स), महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात येते.

यापुढे अशी प्रकरणे निकाली काढण्यापूर्वी जनतेच्या माहितीसाठी तसेच त्याबाबत काही हरकती असल्यास, त्या जाणून घेण्याच्या दृष्टीने विचारणीय जमिनीची संक्षिप्त वस्तुस्थिती १५ दिवसांकरिता संबंधित वनवृत्ताने त्यांच्या कार्यालयीन संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्यांनी त्यांचा अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना पाठवावा. ”

## २.२ शासन परिपत्रक दिनांक ८.०८.२०१३

"शासनाच्या विविध प्रकल्पासाठी / प्रयोजनासाठी भूसंपादन करणे आवश्यक असते, अशा प्रकरणी जमिनीचा वैधानिक दर्जा किंवा त्यास वन कायद्याच्या तरतुदी लागू होतात किंवा कसे, याबाबतची माहिती वन विभागाकडून मागणी करणाऱ्या यंत्रणेस देणे अपेक्षीत आहे. तथापि, अशा प्रकरणात विभागाकडून कोणत्याही प्रकारचा 'ना-हरकत' दाखला / प्रमाणपत्र देण्याची तरतुद वन कायद्यात आढळून येत नाही.

राखीव वने, संरक्षित वने, झुडपी जंगल, खाजगी वने तसेच वनसदृश्य क्षेत्र (Identified Forest) या सर्वांना वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या तरतुदी लागू असून केंद्र शासनाच्या पुर्व मंजूरी शिवाय त्यावर कोणतेही वनेत्तर कामे करता येणार नाही, अशा वनक्षेत्राबाबत वन जमिनीचा दर्जा / प्रकार नमुद करुन त्यावर केंद्र शासनाच्या पूर्व मंजूरी शिवाय वनेत्तर कामे करण्यात येवू नये, असे स्पष्ट नमूद करुन मागणी करणाऱ्या यंत्रणेस वन विभागाकडून कळविणे अपेक्षित आहे.

उक्त नमूद वनक्षेत्राव्यतिरिक्त अन्य वनेत्तर क्षेत्रासंबधी भाष्य करणे वन विभागाच्या अखत्यारितील बाब नसून त्याबाबत कोणतेही 'ना-हरकत' प्रमाणपत्र देणे अपेक्षित नाही. याबाबत संबंधितांनी दक्षता घ्यावी. "

## २.३ शासन परिपत्रक दिनांक ९.०३.२०२६

"उक्त संदर्भ क्र. १ व २ शासन परिपत्रकांन्वये देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच वनक्षेत्राच्या निर्वनीकरणाबाबतचे अभिप्राय आणि प्रादेशिक योजनांमध्ये एकात्मिकृत नगरवसाहत प्रकल्पासाठी व इतर विकास प्रकल्प, जमिनीच्या हस्तांतरणाच्या अनुषंगाने वैधानिक दर्जाबाबत अभिप्राय / ना हरकत प्रमाणपत्र वन विभागाच्या क्षेत्रिय स्तरावरुन परस्पर देण्यात येऊ नये, सदर प्रकरण शासनस्तरावर मान्यतेस्तव सादर करावी."

३. आता, संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकाच्या अनुषंगाने स्पष्टता येण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे -

**अ)** जमिनीच्या वैधानिक दर्जाबाबत अभिप्राय / ना-हरकत प्रमाणपत्र च्या अनुषंगाने प्राप्त प्रकरणांबाबत कार्यवाही करताना, उक्त संदर्भ क्र. १ व २ च्या शासन परिपत्रकांन्वये देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**ब)** ग्रामीण भागात ४ हेक्टर पर्यंत क्षेत्राच्या अनुषंगाने क्षेत्रीयस्तरावर (उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे वनअधिकारी) प्रचलित पध्दतीने अभिप्राय देण्याची अनुमती कायम राहील. तथापि, कोणत्याही प्रकरणी निर्वणीकरणाबाबतचे अभिप्राय क्षेत्रीय स्तरावरुन देण्यात येऊ नयेत.

**क)** ग्रामीण भागात ४ हेक्टर वरील तसेच शहरी / नागरी भागातील सर्व क्षेत्राच्या अनुषंगाने शासन परिपत्रक दि. ९.०३.२०२६ च्या तरतूदी कायम राहतील, अशा प्रकारची प्रकरणे शासन स्तरावर सादर करण्यात यावी.

४. नमूद करण्यात येते की, "शहरी / नागरी क्षेत्र" याचा अर्थ, राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका तसेच सर्व विशेष नगररचना प्राधिकरण / विकास प्राधिकरण (CIDCO, NAINA,

MMRDA, PMRDA, MIDC, MHADA etc.) यांच्याअंतर्गत येणारे / अधिसूचित क्षेत्र त्याचप्रमाणे शासनाद्वारे वेळोवेळी घोषित करण्यात आलेले नागरी क्षेत्र आहे.

**५.** नाशिक क्षेत्रामध्ये संपन्न होण्याऱ्या कुंभमेळयाचे महत्व विचारात घेऊन, कुंभमेळयाशी संबंधित कामकाजास प्रस्तुत दि. ९.०३.२०२६ च्या शासन निर्णयाच्या तरतूदीतून सुट देण्यात येत आहे.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४३०१७५७३२४६१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY NAMDEO JADHAV

Digitally signed by SANJAY NAMDEO JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests DEPARTMENT, 2.5.4.20=5459D36186F52B61CB47B4246001E4C0BBD80C48F89ADEA8F0037E8608934214, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5D495C041EC26693EC8970305B3BF74FD0E430FCD53917C7F440A44AC2DC6A30, cn=SANJAY NAMDEO JADHAV
Date: 2026.04.30 18:03:25 +05'30'

**(संजय जाधव)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
२) अपर मुख्य सचिव (वने व भूसंपादन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (नगर विकास विभाग), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (सर्व)
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे
११) उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी (सर्व)
१२) निवडनस्ती